महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

वर्ष : १८ अंक : २५ जुलै २०२५ पाने : ८

# वीज ग्राहकांना अभिमानाने सांगा वीजदर कपात

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्या नेतृत्वात राज्यात गेली तीन वर्षे ऊर्जा परिवर्तनासाठी काम सुरू असून यामुळे राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर कपातीची ऐतिहासिक व क्रांतिकारी घटना घडली आहे. आगामी काळातील विजेची गरज ध्यानात घेऊन महावितरणने गेल्या दोन वर्षात ४५ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार केले. या करारांमध्ये सौर, पवन आदी नवीकरणीय ऊर्जेवर भर दिल्यामुळे स्वस्तात वीज उपलब्ध होऊन महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. यामुळे घरगुती, औद्योगिक व वाणिज्यिक अशा सर्वांसाठीच्या वीजदरात पाच वर्षे कपात करण्याचा निर्णय शक्य झाला आहे.

आतापर्यंत नियमितपणे वीजदर वाढत होते. यावेळी प्रथमच विजेचे दर वाढण्याच्या ऐवजी कमी झाले आहेत व ते सातत्याने पाच वर्षे कमी होत जाणार आहेत. वीजदर कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणनेच स्वतःहून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला होता. त्यानुसार आयोगाने २५ जून रोजी बहुवार्षिक वीजदर आदेश दिला. वीजदर कपात १ जुलैपासून लागू झाली आहे. महावितरणच्या या कामगिरीसाठी ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

महावितरणच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना माझे आवाहन आहे की, वीजदर कपातीचा आयोगाचा आदेश समजून घ्या आणि महावितरणची ही कामगिरी ग्राहकांना अभिमानाने सांगा. याबाबतीत काही हितसंबंधी गटांकडून गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न चालू असून आपण आकडेवारी व पुराव्यानिशी अपप्रचाराला उत्तर दिले पाहिजे.

राज्यात महावितरणच्या ग्राहकांसाठी लागू झालेली वीजदर कपात ही घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक व कृषी अशा सर्व ग्राहकांसाठी लागू झालेली आहे. सार्वजनिक पाणी पुरवठा आणि पथदिवे यांच्यासाठीही वीजदर कपात लागू झाली आहे. वेगवेगळ्या प्रवर्गासाठीच्या वीजदर कपातीचे प्रमाण वेगवेगळे आहे. तथापि, सर्वच प्रवर्गांसाठी वीजदरात कपात झाली आहे, हे महत्त्वाचे आहे.

### सर्वच घरगुती ग्राहकांना लाभ

घरगुती ग्राहकांमध्ये महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांपासून महिना पाचशे युनिटपेक्षा अधिक वीज वापरणाऱ्या संपन्न ग्राहकांपर्यंत सर्वांच्या वीजदरात कपात झाली आहे.

## हितगुज



**लोकेश चंद्र**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

घरगुती ग्राहकांमध्ये ७० टक्के प्रमाण हे महिना शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांचे आहे. शंभर युनिटपर्यंतच्या वीजदरात तातडीने दहा टक्के कपात झाली आहे आणि आगामी पाच वर्षात अधिक कपात होऊन २६ टक्के वीजदर कपात झालेली दिसेल. महिना शंभर युनिटपेक्षा अधिक वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठीच्या दरातही कपात झाली आहे. शंभर ते तीनशे युनिट वीज वापरासाठीच्या दरात पाच वर्षात पाच टक्के, तीनशे ते पाचशे युनिट वीज वापरासाठी ८ टक्के तर पाचशेपेक्षा अधिक वीजवापरासाठी ४ टक्के दरात घट होणार आहे.

घरगुती वीज ग्राहकांना आता प्रथमच टाईम ऑफ डे (टीओडी) सवलतीचा लाभ मिळणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या सौर कालावधीत वीज वापरल्यास घरगुती ग्राहकांना प्रती युनिट ८० पैसे वीजदरात सवलत मिळणार आहे. ही सवलत दरवर्षी पाच पैसे वाढत जाईल व २०२९-३० या वर्षी ती प्रती युनिट एक रुपये असेल. ही सवलत मिळण्यासाठी टीओडी मीटर अर्थात स्मार्ट मीटर आवश्यक आहे. महावितरणतर्फे ग्राहकांना पोस्टपेड स्मार्ट मीटर मोफत देण्यात येत आहेत, हे सुद्धा ग्राहकांना आवर्जून सांगा.

शंभर युनिटपेक्षा अधिक वीज वापणाऱ्या घरगुती ग्राहकांना टेलिस्कोपिक बिलिंग पद्धतीचा लाभ होतो. शंभर युनिटपर्यंतच्या वीजदरात मोठी कपात झाल्यामुळे त्यापेक्षा अधिक वीज वापरणाऱ्या ग्राहकांनाही त्याचा लाभ आहेच. ज्या घरगुती ग्राहकांनी छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प (रूफ टॉप सोलर) बसविले आहेत त्यांच्यासाठी नेट मिटरिंग पद्धती आहे तशीच कायम राहणार असल्याने त्यांना लाभ होतच राहणार आहे.

### ट्रिलिअन डॉलर्स अर्थव्यवस्थेसाठी...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निश्चित केलेल्या ध्येयाला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलिअन डॉलर्सची करण्याचा निर्धार केला आहे. राज्यातील वीजदर कपातीमुळे ट्रिलिअन डॉलर्स अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकारण्यास मोठी मदत होणार आहे.

लघुदाब व उच्चदाब औद्योगिक वीजदरात कपात करण्यात आली आहे व आगामी पाच वर्षे त्यात घसरण होणार आहे. उद्योगांसाठी दिवसपाळी महत्त्वाची असते. त्या दृष्टीने सकाळी ९ ते सायंकाळी ५ या सौर कालावधीत वापरलेल्या विजेसाठी एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत वापरलेल्या विजेसाठी २५ टक्के अतिरिक्त टीओडी सवलत देण्यात आली आहे. याखेरीज विद्युत नियामक आयोगाने उद्योगांना दिलेल्या सवलती आणि राज्य सरकारने दिलेल्या सवलतींचा विचार करता आता महाराष्ट्रातील उद्योगांसाठीचे वीजदर इतर औद्योगिक मागणी असलेल्या राज्यांच्या तुलनेत स्पर्धात्मक झाले आहेत. आगामी पाच वर्षात ते आणखी स्पर्धात्मक होतील.

उद्योगांसोबत व्यावसायिक वीजदरातही कपात झाल्यामुळे सेवाक्षेत्राला चालना मिळणार आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला असून साडेसात एचपीपर्यंतच्या कृषी पंपांचे चालू बिल सरकार भरत असते. तथापि, आपण हे ध्यानात घ्यायला हवे की शेतीसाठीच्या वीजदरातही कपात करण्यात आली आहे.

आर्थिक विकासासाठी वीज ही मुलभूत गरज आहे. विजेचे दर कमी झाल्यामुळे आर्थिक विकासाला खूप मोठी चालना मिळणार आहे.

### अभिमानाने सांगा, महावितरणचे यश

वीजदरात कपात हे महावितरणचे ऐतिहासिक यश आहे. माझे कंपनीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवाहन आहे की, ग्राहकांच्या हितासाठी त्यांनी ही कामगिरी अभिमानाने सांगितली पाहिजे.

(उर्वरीत मजकूर पान क्र. ८ वर)

# पावसाळ्यात सुरळीत वीजपुरवठा व सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य द्या

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश




बैठकीत आढावा घेताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

**पावसाळ्यात** ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा देण्यासोबतच ग्राहक व कर्मचारी यांच्या विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठी स्थानिक पातळीवर तात्काळ उपाययोजना कराव्यात. कोणत्याही कारणामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यास पर्यायी स्वरूपात किंवा दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करून खंडित विजेचा कालावधी कमीत कमी राहील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात कोकण प्रादेशिक विभागातील नाशिक, जळगाव, भांडूप, कल्याण व रत्नागिरी परिमंडलातील विविध कामांचा लोकेश चंद्र यांनी आढावा घेतला. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (प्रकल्प/संचालन) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे यांची उपस्थिती होती.

फीडर मिटरिंग, नेटवर्क प्लॅनिंग, अधिक वीजहानीच्या उच्चदाब वाहिन्या, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्ती, नवीन वीजजोडण्या, सौरग्राम, विद्युत वाहनांचे चार्जिंग स्टेशन्स, टीओडी मीटर आदींचा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सविस्तर आढावा घेतला.

ते म्हणाले, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेद्वारे सौरग्राम योजनेला मोठे पाठबळ मिळत आहे. सर्वच घरगुती ग्राहकांना या योजनेचा लाभ घेऊन स्वतःच्या गावाला सौरग्राम करता येणे सहज शक्य आहे. तसेच या योजनेतून पुढील २५ वर्ष मोफत वीज घरगुती ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. दोन्ही योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी स्थानिक अभियंता, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी गावागावांमध्ये प्रबोधन करण्याची सूचना त्यांनी दिली.

या आढावा बैठकीला कोकण प्रादेशिक विभागातील मुख्य अभियंते सुंदर लटपटे (नाशिक), इब्राहीम मुलाणी (जळगाव), चंद्रमणी मिश्रा (कल्याण), संजय पाटील (भांडूप) व अनिल डोये (रत्नागिरी) यांच्यासह सर्व अधिक्षक अभियंते, कार्यकारी अभियंते व अधिकारी उपस्थित होते.

# कर्मचाऱ्यांच्या सुरक्षा साधनांसाठी 'ऑनलाइन मॉड्यूल'

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते उद्घाटन

**वीज यंत्रणेत** सुरक्षितपणे देखभाल व दुरूस्तीचे कामे करण्यासाठी तांत्रिक कर्मचाऱ्यांना महावितरणकडून २० ते २५ प्रकारचे वैयक्तिक व कॉमन सुरक्षा साधने देण्यात येतात. ही सुरक्षा साधने आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यासाठी तयार केलेल्या स्वतंत्र 'टी अँन्ड पी रजिस्टर मॉड्यूल'चे उद्घाटन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते नाशिक येथे झाले. वीज यंत्रणेत काम करताना कोणत्याही परिस्थितीत कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनांचा वापर करावा व सुरक्षिततेची पूर्ण खात्री करूनच देखभाल व दुरूस्तीचे कामे करावीत असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

एम्प्लॉई पोर्टलवरील या स्वतंत्र मॉड्यूलमुळे सुरक्षेचे सर्व साधने व साहित्य तसेच चाचणी उपकरणांची उपलब्धता, वितरण, मागणी, पुरवठा व प्राप्तीची नोंद आदींचा लेखाजोगा ऑनलाइन उपलब्ध राहणार आहे. नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते हे मॉड्यूल कार्यान्वित करण्यात आले. यावेळी कोकण विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक प्रसाद रेशमे, मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) अरविंद भादिकर यांची उपस्थिती होती.

ग्रामीण, शहरी शाखा कार्यालये, वीज उपकेंद्र, चाचणी विभाग, भरारी पथक, फिल्टर युनिट आदी कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना टेस्टर, स्क्रू ड्रायव्हर, रबर हातमोजे, गमबूट, रेनकोट, सेफ्टी बेल्ट, झुला, शूज आदी वैयक्तिक तसेच शिडी, एचटी व एलटीचे फोल्डेबल डिस्चार्ज रॉड, बॉक्स स्पॅनर, टॉर्च, मेगर, ड्रील मशीन आदी कॉमन सुरक्षा साधने आणि चाचणीसाठी काही उपकरणे देण्यात येतात. आतापर्यंत या साहित्यांची लेखी मागणी नोंदविणे, त्यास मंजूरी मिळणे, मंडल कार्यालयाकडून ते उपलब्ध होणे व वितरीत होणे ही पारंपरिक प्रक्रिया सुरू होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या सुचनेनुसार प्रशिक्षण व सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने संयुक्तपणे या मॉड्यूलची निर्मिती केली आहे. या मॉड्यूलद्वारे आता केवळ एका क्लिकद्वारे तांत्रिक कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साधनांची मागणी करता येणार आहे. सोबतच कर्मचाऱ्यांकडे व प्रत्येक मंडलस्तरावर उपलब्ध असलेल्या सर्व सुरक्षा साधनांचा लेखाजोगा या मॉड्यूलवर उपलब्ध राहणार आहे.




तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा साधनांचा मागणीनुसार तात्काळ पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र मॉड्यूलचे उद्घाटन करताना अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

या मॉड्यूलमुळे सुरक्षा साधनांचे वितरण पारदर्शक, तत्परतेने होणार आहे. तसेच वेळीच खरेदी प्रक्रिया करून आवश्यक सुरक्षा साधने भांडारात उपलब्ध ठेवण्याचे नियोजन करता येईल. प्रत्येक साहित्याला गुणवत्तेसाठी वापरण्याची स्वतंत्र मुदत आहे. मुदतीनंतर ते बदलण्यात येते किंवा त्याआधीच खराब झाल्यास त्याची देखील नव्याने मागणी या मॉड्यूलद्वारे केवळ एका क्लिकवर नोंदविण्याची सोय कर्मचाऱ्यांना झाली आहे.

# मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रेडवा आणि भेंडीमहाल सौर प्रकल्पांचे लोकार्पण

**मनात्री आणि अकोलखेड या दोन सौर प्रकल्पाचे भूमिपूजन, ३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद या दोन नविन उपकेंद्राचे भूमिपूजन**




अकोला येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करताना मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस. समवेत मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मा. कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे आदी.

**अकोला :** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अतंर्गत पूर्ण झालेल्या बार्शी टाकळी तालुक्यातील रेडवा (२ मेगावॅट) आणि भेंडीमहाल (१० मेगावॅट) या दोन सौर प्रकल्पाचे लोकार्पण, तेल्हारा तालुक्यातील मनात्री (१० मेगावॅट) आणि अकोट तालुक्यातील अकोलखेड (१० मेगावॅट) सौर प्रकल्पाचे भुमिपूजन तसेच मुर्तिजापूर तालुक्यातील ३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद या दोन नविन उपकेंद्राचे भूमिपूजन मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवनात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रवींद्र चव्हाण, आमदार हरिष पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार किरण सरनाईक, आमदार श्याम खोडे, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, पोलीस महानिरीक्षक रामराव पोकळे, जिल्हाधिकारी अजित कुंभार, पोलिस अधिक्षक अर्जित चांडक आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी राज्य शासन सातत्याने कार्यरत असून शेतीला दिवसा आणि शाश्वत वीज पुरवठा करण्यासाठी असलेली शासनाची महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात विकेंद्रीत सौर प्रकल्प उभारून १६ हजार मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत पूर्ण झालेल्या बार्शी टाकळी तालुक्यात रेडवा सौर प्रकल्पातून २ मेगावॅट आणि भेंडीमहाल सौर प्रकल्पातून १० मेगावॅट इतकी हरित ऊर्जा निर्माण होणार आहे. या दोन्ही प्रकल्पामुळे बार्शी टाकळी तालुक्यातील दगड पारवा, कान्हेरी, रेडवा, धाबा, बार्शीटाकळी, पातुर नंदापूर, महान, महागाव, बहिरखेड, घोटा इत्यादी गावातील २ हजार ५९५ शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना दिवसा वीज पुरवठा होणार आहे.

मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलेल्या तेल्हारा तालुक्यातील मनात्री आणि अकोट तालुक्यातील अकोलखेड या दोन्ही सौर प्रकल्पाची क्षमता प्रत्येकी १० मेगावॅट एवढी असून या प्रकल्पामुळे परिसरातील १५०० शेतकऱ्यांना दिवसा विज उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत आत्तापर्यंत १० सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून ५० मेगावॅट एवढी हरित ऊर्जा निर्मिती होत आहे. तसेच या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील १४ हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कृषीपंपाना दिवसा वीजेची सोय झाली आहे.

**३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद उपकेंद्राचे भूमिपूजन :**

मा. मुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांच्याहस्ते मुर्तिजापूर तालुक्यातील ३३ केव्ही हिवरा कोरडे आणि ३३ केव्ही पारद या दोन उपकेंद्राचे भूमिपूजन करण्यात आले. प्रणाली मजबूतीकरण (AIBB) योजनेअंतर्गत प्रत्येकी ५ एम.व्ही.ए. क्षमता असलेल्या आणि ६.४८ कोटी खर्च करून उभारण्यात येत असलेल्या महावितरणच्या या दोन उपकेंद्रामुळे माना, हिवरा कोरडे, शेलूबाजार, सोनोरी, बपोरी, पोटा, कवठा, खोलापूर, येंडली, पिंगळा, नवरंगपूर, मंडूरा, बल्लारखेड, भटोरी, सांगवामेळ, पारद, चुंगशी, मुंगशी, विहीरवाडा, दताळा आदी गावांना दर्जेदार, सुरळीत वीज पुरवठा मिळेल. या कार्यक्रमास मुख्य अभियंता राजेश नाईक, अधीक्षक अभियंता प्रतिक्षा शंभरकर, कार्यकारी अभियंते अजितपालसिंह दिनोरे, गोरक्षनाथ सपकाळे, अनिल उईके, शशांक पोंक्षे उपस्थित होते.

# महाराष्ट्र शासनाचा कॅलिफोर्निया विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार

**मुंबई:** महाराष्ट्र शासनाने बर्कले येथील जागतिक कीर्तीच्या कॅलिफोर्निया विद्यापीठासोबत ऊर्जा संशोधन आणि धोरण विकासासाठी सामंजस्य करार केला आहे. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात मा. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्ण बी., महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक संजीव कुमार आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव उपस्थित होते. आभा शुक्ला आणि मोहित भार्गव यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

'या करारामुळे महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात संशोधन, तांत्रिक नवकल्पना आणि धोरणात्मक सहकार्याला चालना मिळणार आहे. स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणारी वीज, ऊर्जा साठवणूक, वीज बाजार रचना, ग्रिड प्रसारणातील सुधारणा, हवामान अनुकूल धोरणे आणि प्रशिक्षण कार्यक्रमांवर संयुक्तपणे काम होईल. कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे ऊर्जा संशोधन आणि नवोन्मेषाला गती मिळेल. हा करार स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरेल. ऊर्जा साठवणूक, वीज बाजार आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी संयुक्त संशोधन आणि क्षमतावृद्धीला प्रोत्साहन मिळेल', असे मा. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. 'हा करार परस्पर विश्वास, समानता आणि सामूहिक हितावर आधारित आहे. यामुळे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि प्रशासनाला नवसंशोधन, प्रशिक्षण आणि क्षमतावृद्धीच्या संधी मिळतील. पर्यावरणस्नेही आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने राज्याचा प्रवास गतिमान होईल', असे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी नमूद केले.



▸▸ कॅलिफोर्निया विद्यापीठासोबत सामंजस्य करारप्रसंगी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव आदी.

# सुरक्षित व अखंडित वीज पुरवठ्यासाठी काम करा

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे निर्देश




▸▸ आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र. समवेत सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

**छत्रपती संभाजीनगर:** वीज ग्राहकांना दर्जेदार, सुरळित व अखंडित सेवा देण्यासाठी तांत्रिक व पायाभुत सुविधांच्या कामांचा दर्जा राखा. वीजपुरवठा सतत खंडित होणार नाही, याची दक्षता बाळगा. विजेची सेवा प्रदान करतांना सुरक्षिततेची काळजी घ्या. ग्राहकांच्या समस्यांचा प्राधान्याने निपटारा करा. वीज ग्राहक सेवेबरोबर चालू वीज बिलासह थकबाकी नियमित वसूल करा, असे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयांतर्गत छत्रपती संभाजीनगर, लातूर व नांदेड परिमंडलांच्या विशेष आढावा बैठकीत ते बोलत होते. सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने, संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कच्छोट, अरविंद बुलबुले, राजाराम माने यावेळी उपस्थित होते.

लोकेश चंद्र पुढे बोलतांना म्हणाले की, वीज पुरवठा खंडित होण्याची पूर्वसूचना एसएमएसद्वारे देण्याची खबरदारी घ्यावी. कमीत-कमी वेळेत खंडित वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न करावे. विजेची तांत्रिक कामे दर्जेदार करा. वीज चोरीचे प्रमाण अधिक असणाऱ्या वीजवाहिन्या व व नादुरूस्त मीटरचे प्रमाण जास्त असलेल्या ठिकाणी स्मार्ट मीटर बसवावेत. राज्यात ३० लाख स्मार्ट मीटर लावण्यात आलेले आहेत. परिणामी त्या भागात वीजगळतीचे प्रमाण कमी झाले आहे. स्मार्ट मीटर हे ग्राहकांच्या फायद्याचेच असल्याचे त्यांनी विविध निष्कर्षासह स्पष्ट केले. राज्यात १५ गावे सौरग्राम झाली असून मराठवाड्यात फक्त एक गाव सौरग्राम बनू शकले. इतरही गावे सौरग्राम होण्यासाठी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणेला सहभागी करून घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. 'मागेल त्याला सौर कृषिपंप', 'मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजने'ला मराठवाड्यात सर्वाधिक प्रतिसाद मिळाला आहे. या योजनांच्या प्रतिक्षा यादीतील अर्जांच्या त्रूटी दूर करून अधिकाधिक शेतकऱ्यांना या योजनांचा लाभ देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

वाळूज, चिकलठाणा, शेंद्रा व रेल्वेस्टेशन भागातील उद्योजकांच्या वीज पुरवठ्याबाबत विविध समस्या व्यवस्थापकीय संचालक चंद्र यांनी जाणून घेतल्या. उद्योगांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी महावितरण कटिबध्द असल्याचे स्पष्ट करून त्यांनी उद्योजकांच्या समस्यांबाबत आवश्यक निर्देश दिले.

# अहोरात्र व अथक परिश्रमातून प्रकाशदूतांनी केला खारघरचा वीजपुरवठा सुरळीत

**भांडुप परिमंडल:** पनवेल शहर विभागांतर्गत भिंगारी उपविभागातील ३३ केव्ही अधिराज उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या मुख्य वीज वाहिनीवर २४ जूनला दुपारी तीनच्या सुमारास केबलला आग लागून मोठा बिघाड उद्भवला. सलग वीस तास अथक व अहोरात्र परिश्रम करत जनमित्रांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दुरुस्तीचे अवघड लक्ष्य साध्य करून बाधित भागाचा वीजपुरवठा सुरळीत केला.

मुख्य वीज वाहिनीसह केबल डक्टमधील इतर केबलही आगीच्या भक्षस्थानी पडल्या. परिणामी सेक्टर-२९ येथील मुख्य स्विचिंग उपकेंद्रास वीजपुरवठा करणाऱ्या इतर उच्चदाब वाहिन्या नादुरुस्त झाल्या. त्यामुळे खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ तसेच सेक्टर-३५ व सेक्टर-३६ येथील वीजपुरवठा खंडित झाला. ३३ केव्ही अधिराज फिडर जळाल्यामुळे ३३ केव्हीचे ६ केबल नादुरुस्त झाले. यातून १२६ वितरण रोहित्र बाधित झाले व २ उपकेंद्र बंद पडले. तर खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ मधील १२ रोहित्र, तसेच एसव्हीकेएम कॉलेज येथील २ रोहित्रांसह सेक्टर-३५ चा वीजपुरवठा खंडित झाला.

सर्व केबल डक्टमध्ये असल्याने व सदर डक्ट कॉंक्रीट रस्ताखाली बंदिस्त असल्यामुळे बिघाड शोधणे अत्यंत कठीण बनले. तसेच संपूर्ण डक्टमधून मोठ्या प्रमाणात धूर येत होता. अग्निशमन दलाचा मदतीने डक्टमधील आग शमवण्यात आली व नंतर खोदकाम करून जळालेल्या व नादुरुस्त केबल हटवण्यात आल्या. त्याठिकाणी दुसऱ्या नवीन केबल टाकण्यात आल्या. आग विझवल्यानंतर २४ जूनच्या सायंकाळपासून रात्रभर व २५ जूनला वीजपुरवठा पूर्ववत होईपर्यंत अथकपणे व युद्धपातळीवर काम सुरू होते. २० तासाच्या अविरत कामानंतर २५ जूनला दुपारी १२ वाजता सर्व फीडर चार्ज करून बाधित झालेल्या वीजपुरवठा पूर्ववत करण्यात यश आले.



▸▸ भिंगारी उपविभागातील ३३ केव्ही अधिराज उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या मुख्य वीज वाहिनीवर दुरुस्तीचे काम करताना जनमित्र.

मुख्य अभियंता संजय पाटील व वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांनी दुरुस्तीच्या ठिकाणी स्वतः उपस्थित राहत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करून काम लवकर पूर्ण करण्यास प्रोत्साहीत केले. जनमित्र रामचंद्र गायकवाड, सुरज चौहाण, स्वप्निल मडवी, रूपेश जाधव यांच्या चमुने ही कामगिरी केली.

# भर पावसात खांब उभारुन केला वीजपुरवठा पूर्ववत

## जनमित्रांचे नागरिकांकडून कौतूक

**कोल्हापूर परिमंडल:** चंदगड तालुक्यातील पार्ले उपकेंद्राला जोडणाऱ्या ३३ केव्ही वीजवाहिनीचा पुराच्या पाण्यामुळे पडलेला खांब उभारून वीजपुरवठा पूर्ववत करताना जनमित्रांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. कोसळणारा संततधार पाऊस, मोठ्या प्रमाणात पडलेले धुके, जोराचा वारा, पुराचे वाढणारे पाणी अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत जनमित्रांनी २२ वाड्या-वस्त्यातील ३ हजार ८०० ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत केला. वीजपुरवठा पुर्ववत करण्यासाठी जनमित्र व कंत्राटदाराच्या कामगारांनी केलेल्या या कामाचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले आहे.

पुराच्या पाण्यामुळे पार्ले वीजवाहिनीचा एक खांब २४ जूनला सायंकाळी जमिनदोस्त झाला. या खांबासोबतच आजूबाजूच्या खांबांवरील ताराही धराशाही झाल्या. परिणामी पार्ले ३३/११ केव्ही उपकेंद्रावरील २२ वाड्या-वस्त्यातील जवळपास ३ हजार ८०० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान पुराचे पाणी वाढत असल्याने २५ जूनला सकाळी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. जनमित्रांनी प्रथम पडलेल्या खांबावरील तारा गोळा करण्यास सुरुवात केली. तीनपैकी दोन तारा (कंडक्टर) वेगळ्या करण्यात कर्मचाऱ्यांना यश आले. तिसरी तार काढताना पडलेला पोल अचाकन फिरल्याने उर्वरित तार वेगळी करणे अशक्य झाले. पुराचे पाणी वाढत असल्याने सायंकाळी ६.०० वाजता काम थांबवून कर्मचाऱ्यांना सुरक्षित बाहेर पडावे लागले. पर्यायी यंत्रणेद्वारे (रिंगफिडींग) काही गावांचा विजपुरवठा रात्री ९.३० वाजता सुरू करण्यात आला.

पावसाने थोडी उसंत दिल्याने २६ जूनला पुराची पाणी पातळी थोडी कमी झाली व भल्या सकाळीच जनमित्र कामाला लागले. जनमित्रांनी लोखंडी खांब ५०० मीटर अंतरापर्यंत चिखलातून खांद्यावर वाहून आणला. खड्डा खणून खांब उभा करण्यात आला व तारा ओढून घेण्यात आल्या. सायंकाळी ३३ केव्ही पार्ले वाहिनीचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात कर्मचाऱ्यांना यश आले. गडहिंग्लज विभागाचे कार्यकारी अभियंता संजय पोवार, उपकार्यकारी अभियंता अजित पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक अभियंता विठ्ठल चौगुले, गुरुप्रसाद मोरे, जनमित्र नारायण दळवी, अमोल दळवी, ओमप्रकाश पटेल, अमित गावडे, दीपक गावडे, प्रदीप तोरस्कर व खाजगी कंत्राटदार यांचे कामगार यांनी ही कामगिरी केली. या कामाबद्दल परिसरातील वीज ग्राहक व नागरिकांनी जनमित्रांचे कौतुक केले आहे.



▸▸ पार्ले उपकेंद्राला जोडणाऱ्या ३३ केव्ही वीजवाहिनीचा पुराच्या पाण्यामुळे पडलेला खांब उभारताना जनमित्र.

## वृषाली इंगुले यांची मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी निवड



**मुख्यालयात** कार्यरत श्रीमती वृषाली पांडुरंग इंगुले व्यवस्थापक (मा.सं ) यांची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (MPSC) नागरी सेवा परीक्षा-२०२१ मधून मुंबई महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्तपदी निवड झाली. त्यांनी अंतिम निवड यादीत अनारक्षित महिला कोट्यात दुसरे स्थान प्राप्त केले. वृषाली इंगुले महावितरण कंपनीत उपव्यवस्थापक (मा.सं ) म्हणून २०१२ मध्ये रुजू झाल्या. त्यांनी १३ वर्षे महावितरण कंपनीत सेवा बजावली. त्यांनी बीफार्म, एम.बी.ए, एल.एल.बी व एन.ई.टी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केल्या आहेत.त्या मूळच्या दौंड तालुक्यातील रहिवासी आहेत.

## नितीन सावर्डेकर यांची टॅलेंट हंट सर्च समितीवर निवड



**कोल्हापूर परिमंडल:** पुणेस्थित महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून २०२५-२६ या वर्षासाठी नितीन सावर्डेकर यांची टॅलेंट हंट सर्च समितीवर निवड झाली आहे. सावर्डेकर हे सांगली शहर विभागात सहाय्यक लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून खेळताना १६ व १९ वर्षाखालील गटात कर्णधारपद सांभाळले आहे. शिवाय जवळपास एक तप खुल्या गटाचे प्रतिनिधित्व व शिवाजी विद्यापीठाचे चार वर्षे प्रतिनिधीत्व केले आहे. सध्या ते कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून १४ व १६ वर्षे वयोगटाच्या निवड समितीचे सदस्य म्हणून काम पाहतात. त्यांची महावितरणमध्ये खेळाडू कोट्यातून नियुक्ती झाली असून महावितरणच्या राष्ट्रीय संघात गेल्या १७ वर्षांपासून ते सातत्याने खेळत आहेत. महावितरणच्या राष्ट्रीय संघाचे कर्णधार पदही त्यांनी सांभाळले आहे.

## दहावी परिक्षेतेतील गुणवंत पाल्यांचे हार्दिक अभिनंदन !



**चि. विराज चतरकर**
इयत्ता १० वी
९४%
पालक - राजेश चतरकर
प्रिन्सिपल ऑपरेटर
३३ के.व्ही. उपकेंद्र, कानशिवनी
ग्रामीण विभाग, अकोला



**कु. संस्कृती शहापूरकर**
इयत्ता १० वी
९६.६०%
पालक शिदुआप्पा शहापूरकर
प्रमुख लिपिक
कोकण प्रादेशिक विभाग
कल्याण.

## पुष्कर ग्रामोपाध्ये 'सीए' परिक्षेत उत्तीर्ण



**द ईन्स्टिट्युट** ऑफ चार्टर्ड अकाऊंटंस् ऑफ इंडियाकडून मे-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या 'सीए'च्या परिक्षेत पुष्कर प्रदीप ग्रामोपाध्ये याने यश मिळवले आहे. फलटण विभागात कार्यरत प्रदीप ग्रामोपाध्ये यांचा तो मुलगा आहे. या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तुकोबांच्या पालखी सोहळ्यात ऊर्जा प्रबोधन वारी



जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्यात अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जा प्रबोधन करताना जनमित्र.

**बारामती परिमंडल:** जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर या वारीत महावितरणचे अधिकारी व कर्मचारीही सहभागी झाले. विठुनामाच्या गजरासोबतच ऊर्जा प्रबोधन करत त्यांनी निरा पूल ते अकलूज असा प्रवास केला.

शासनाकडून ज्याप्रमाणे 'निर्मलवारी' उपक्रम राबवण्यात येतो त्याच धर्तीवर महावितरणनेही विजेच्या दृष्टीने ही वारी सुरक्षित वारी ठरेल, यासाठी पुरेपूर प्रयत्न केला. वारीच्या अनुषंगाने सुरुवातीपासूनच वारीचा मार्ग विजेच्या दृष्टीने सुरक्षित राहील यावर काम करण्यात आले. त्यात जिथे पालखी तळ आहेत, तेथील रोहित्रांना कुंपण घालणे, विजेच्या तारांना ताण देणे, खांब सरळ करणे, तारांचे रस्त्यापासून सुरक्षित अंतर ठेवणे या कामांचा समावेश आहे.

विद्युत सुरक्षेच्या कामांबरोबरच विद्युत सुरक्षा व ऊर्जा संवर्धनाचे प्रबोधन करण्याचे कामही जनमित्रांकडून करण्यात आले. सोलापूर मंडलाचे अधीक्षक अभियंता सुनील माने व अकलूजचे कार्यकारी अभियंता अण्णासाहेब काळे यांच्यासह अकलूज विभागातील जनमित्रांनी हातात सुरक्षा संदेशाचे फलक घेत प्रबोधन केले. या उपक्रमाचे वारकऱ्यांसह नागरिकांनीही कौतुक केले.

# अखंडित वीज सेवेसाठी पर्यायी आणि कायमस्वरूपी व्यवस्थेचे नियोजन करा

## संचालक (संचालन) सचिन तालेवार यांचे निर्देश

**अमरावती परिमंडल:** अखंडित वीज सेवा देणे ही आपली जबाबदारी आहे. त्यामुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याची कारणे शोधा, फिडरची लांबी जास्त असेल तर त्याची विभागणी करा. नवीन डिटीसी, एबी स्विच लावा तसेच वीज पुरवठा अखंडित रहावा, यासाठी पर्यायी व्यवस्थेचे कायमस्वरूपी नियोजन करा. आरडीएसएस योजनेअंतर्गत सुरू असलेल्या वीज यंत्रणा सुधारणा आणि मजबूतीकरणाच्या कामांना गती द्या, असे निर्देश संचालक (संचालन) सचिन तालेवार यांनी दिले.

अमरावतीतील विद्युत भवन येथे झालेल्या अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्याच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता अशोक साळुंके, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, प्रविण दरोली तसेच परिमंडलातील सर्व विभागीय, उपविभागीय अभियंते उपस्थित होते.



अमरावतीतील विद्युतभवन येथे झालेल्या अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्याच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना संचालक (संचालन) सचिन तालेवार.

संचालक (संचालन) तालेवार यांनी फिडर निहाय वीज पुरवठा खंडित कालावधीचा आढावा घेतला. कार्यकारी अभियंता यांनी देखभाल दुरूस्तीच्या कामावर नियंत्रण ठेवावे. तसेच ग्राहकांची तक्रार होणार नाही, यासाठी सक्षम अधिकारी यांच्या परवानगीने आणि वीज ग्राहकाला पूर्वसुचना देवूनच देखभाल-दुरूस्तीसाठी वीज पुरवठा बंद करावा. औद्योगिक ग्राहकांची भूमिका जिल्ह्याच्या विकासात महत्वाची आहे. उद्योजकांच्या वीज सेवेतील अडचणी जाणून घेऊन त्यांची प्राधान्याने सोडवणूक करा. कार्यकारी अभियंता आणि अधीक्षक अभियंता यांनी दरमहा जिल्ह्यातील उद्योजकांसोबत बैठक घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी बोलतांना श्री. तालेवार म्हणाले की, वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून महावितरणमध्ये अनेक धोरणात्मक बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे परिमंडलातील शेवटच्या कर्मचाऱ्यांना महावितरणची ध्येय धोरणे, मुख्य कार्यालयातील बैठकांच्या निर्देशांबाबत माहिती देण्यासाठी नियमित संवाद साधा. तक्रार घेऊन येणाऱ्या ग्राहकांना सौजन्याची वागणूक द्या. नवीन वीज जोडणीचे व नावात बदलाचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले.

# आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत रत्नागिरीचे 'आवर्त' प्रथम

## कर्तव्य सांभाळून नाट्यकला जोपासणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांचे संचालक राजेंद्र पवार यांच्याकडून कौतुक

**जळगाव परिमंडल:** नाटक हे अनेक कलांचा संगम असते. अभिनय, संगीत, आशय, रंग आणि वेषभूषा त्यात सामावलेल्या आहेत. 'रिटेक' ची कुठलीही व्यवस्था नसलेले नाटक हे इतर माध्यमांच्या तुलनेत अवघड आहे. तरीही विजेसारख्या अत्यंत कठीण आणि अतिमहत्त्वाच्या क्षेत्रात आपले कर्तव्य बजावून महावितरणचे कर्मचारी नाट्यकला जोपासतात, याचा अभिमान वाटतो. अशा शब्दात कौतुक करीत महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी स्पर्धेत सहभागी नाट्यकलावंतांचा सन्मान केला.

जळगाव शहरात कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयांतर्गत असणाऱ्या परिमंडलाच्या नाट्यस्पर्धा संपन्न झाल्या. छत्रपती संभाजी राजे नाट्यमंदिरात झालेल्या स्पर्धेत जळगाव परिमंडलाचे (झेंडा रोविला), भांडूपचे (कुसुम मनोहर लेले), रत्नागिरीचे (आवर्त), नाशिकचे (दानव), सांघिक कार्यालय मुंबईचे (मोक्षदाह) व कल्याण परिमंडलाचे (टर्निंग पॉईंट) ही सहा नाटके सादर झाली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संचालक राजेंद्र पवार



कोकण प्रादेशिक विभाग कार्यालयांतर्गत आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेतील विजेत्या संघाला पारितोषिक प्रदान करताना संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार.

उपस्थित होते. व्यासपीठावर मुख्यालयातील चाचणी विभागाचे मुख्य अभियंता डॉ. मनिष वाठ, जळगावचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे, अधीक्षक अभियंता विनोद पाटील, निरज वैरागडे, मनोज विश्वासे, नाट्य परीक्षक प्राचार्य डॉ. शशिकांत चौधरी, सौ. अर्चना राज कुबेर, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, सहाय्यक महाव्यवस्थापक अशोक केदारे यांची उपस्थिती होती.

संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते नाट्य स्पर्धेचा निकाल जाहीर करून विजेत्या संघ आणि नाट्यकलावंतांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेत अनिरुद्ध रांजेकर लिखित आवर्त हे नाटक प्रथम पुरस्काराने सन्मानित झाले. रत्नागिरी परिमंडळातर्फे ते सादर करण्यात आले होते. नाटकाची निर्मिती अनिल डोये यांची होती. निर्मितीमधील दुसरे पारितोषिक संजय पाटील निर्मित भांडुपच्या कुसुम मनोहर लेले' या नाटकास मिळाले.

दिग्दर्शनासाठी प्रथम राजू पुणेकर यांना 'आवर्त' या रत्नागिरीच्या नाटकास तर द्वितीय पुरस्कार भांडूपच्या 'कुसुम मनोहर लेले' साठी चंद्रमणी मेश्राम यांना मिळाले.

अभिनयात पुरुष प्रवर्गात दुर्गेश जगताप (रत्नागिरी - आवर्त), प्रथम तर द्वितीय देववृत्त पवार यांना (भांडूप - कुसुम मनोहर लेले) मिळाले. स्त्री अभिनयासाठी प्रथम रूपाली पाटील (भांडूप - कुसुम मनोहर लेले) तर द्वितीय पारितोषिक श्रद्धा मुळे (रत्नागिरी - आवर्त) यांना देण्यात आली.

नेपथ्यसाठी प्रथम राजेंद्र जाधव (रत्नागिरी - आवर्त), तर द्वितीय श्रीधर शिंदे (सांघिक कार्यालय मुंबई - मोक्षदाह), यांना देण्यात आले.

(उर्वरीत मजकूर पान क्र. ८ वर)

# जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये महावितरणला सहा पुरस्कार;

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना दोन पुरस्कार

**मुंबई:** जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये 'उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५' अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी महावितरण सहा पुरस्कारांचे मानकरी ठरले. यात अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचा वैयक्तिक गटात दोन पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे.

मानव संसाधन विकासाला चालना, कर्मचारी क्षमता, कौशल्य व ज्ञानाचा विकास, नवीन संकल्पना, एआय तंत्रज्ञान तसेच हरित ऊर्जेचा वापर व योजना आदींवर मुंबई येथे एक दिवसीय जागतिक मानव संसाधन विकास परिषद झाली. देशभरातील खासगी व सरकारी कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी या परिषदेला उपस्थित होते. यावेळी महावितरणकडून कर्मचारी प्रशिक्षण, विद्युत सुरक्षा मोहीम, एआय तंत्रज्ञानाचा वापर, हरित ऊर्जेवरील विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या परिषदेत 'उत्कृष्टतेसाठी राष्ट्रीय पुरस्कार २०२५' अंतर्गत विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. यात महावितरणला सहा पुरस्कारांनी गौरवण्यात आले. सांघिक गटामध्ये, शेतकऱ्यांचे दिवसा वीजपुरवठ्याचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'बेस्ट इनोव्हेशन इन पॉवर/ एनर्जी', मानव संसाधन विभाग अंतर्गत कर्मचारी कौशल्य विकास, क्षमतावाढ प्रशिक्षण व विद्युत सुरक्षेचे उपक्रम यासाठी 'अवार्ड फॉर एक्सलेन्स इन ट्रेनिंग', पुणे येथील हरित ऊर्जेवरील राज्यात पहिल्या विद्युत वाहन चार्जिंग स्टेशनसाठी 'बेस्ट एनवायरनमेंट फ्रेंडली प्रोजेक्ट' हे तीन पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांना वैयक्तिक गटात 'सीएमडी ऑफ द इयर' व 'लिडरशिप एक्सलेन्स इन टेक्नोलॉजी इनोव्हेशन' हे दोन पुरस्कार तर संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांना 'प्राईड ऑफ द प्रोफेशन' पुरस्कार जाहीर झाला. या परिषदेत मानव संसाधन विकासाचे विशेषज्ञ डॉ. आर. एल. भाटिया, 'आयआयएमए'च्या माजी अधिष्ठाता डॉ. इंदिरा पारेख



जागतिक मानव संसाधन विकास परिषदेमध्ये महावितरणला उत्कृष्ट कामगिरीसाठी मिळालेल्या सहा पुरस्कारांसह अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र व संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट.

यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट, कार्यकारी अभियंता (प्रशिक्षण) नरेंद्र सोनवणे, उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी, सहायक अभियंता रूपेश खरपकर यांनी हे पुरस्कार स्वीकारले.

(हितगुज : पान क्र. १ वरून)

राज्यात विजेचे दर प्रथमच कमी झाले आहेत, आगामी पाच वर्षे हे दर आणखी कमी होत जाणार आहेत, विविध प्रवर्गासाठीची दरकपात वेगवेगळी असली तरी घरगुती, औद्योगिक, वाणिज्यिक व कृषी अशा सर्व ग्राहकांसाठीचे दर कमी झाले आहेत, महावितरणने गेल्या दोन वर्षात केलेल्या वीजखरेदी करारांमुळे ६६ हजार कोटींची बचत होऊन ग्राहकांना वीजदर कपातीच्या स्वरुपात लाभ होत आहे, महावितरणने अशी बचत केली नसती तर आगामी पाच वर्षात पारंपरिक पद्धतीने वीजदर खूप वाढले असते आणि स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांना दिवसाच्या वीजवापरासाठी अधिक सवलत मिळणार आहे, हे सहा मुद्दे आपल्या बोलण्यात यावेत.

महावितरणचे अधिकारी व कर्मचारी हेच कंपनीचे जनतेमधील दूत आहेत. त्यांनी कंपनीचे हे यश अभिमानाने सांगितले पाहिजे.

(पान क्र. ७ वरून)

स्री अभिनयासाठी प्रथम रुपाली पाटील (भांडूप – कुसुम मनोहर लेले) तर द्वितीय पारितोषिक श्रद्धा मुळे (रत्नागिरी – आवर्त) यांना देण्यात आली.

नेपथ्यसाठी प्रथम राजेंद्र जाधव (रत्नागिरी – आवर्त), तर द्वितीय श्रीधर शिंदे (सांघिक कार्यालय मुंबई – मोक्षदाह), यांना देण्यात आले.

प्रकाश योजनेसाठी प्रथम प्रणाली निमजे (रत्नागिरी – आवर्त), तर द्वितीय संदीप संकपाळ, (भांडुप – कुसुम मनोहर लेले) यांना देण्यात आले. संगीत योजनेसाठी प्रथम नितीन देसाई (रत्नागिरी – आवर्त), तर व्दितीय रवींद्र चौधरी (जळगाव – झेंडा रोविला) यांना देण्यात आले.

रंग व वेशभूषेसाठी प्रथम पारितोषीक आशिष कासार (जळगाव – झेंडा रोविला) तर द्वितीय पुरस्कार श्रीमती नमिता गजधर (भांडूप – कुसुम मनोहर लेले) यांना देण्यात आले.

उत्तेजनार्थ मध्ये देववृत्त पवार (भांडूप – कुसुम मनोहर लेले) सचिन पुरव (नाशिक – दानव), अनुराधा गोखले (रत्नागिरी – आवर्त), विजेंद्र भोवड (सांघिक कार्यालय मुंबई – मोक्षदाह), सायली संन्याशी (कल्याण परिमंडळ – टर्निंग पॉईंट), प्रणिता शिंदे (जळगाव – झेंडा रोविला) यांना देण्यात आले. कर्मचारी लेखन प्रवर्गातून ग्यानेश पाटील यांना टर्निंग पॉईंट या नाटकासाठी पारितोषिक देण्यात आले. तर बालकलाकार प्रवगातही बक्षिसे देण्यात आली.



Printed & Published by Shri. Bharat Pawar of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd. Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011.
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001. Tel. : 2261 9100
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक : भारत पवार • उपसंपादक : विजयसिंह दुधभाते
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता
प्रकाशगड, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)